लिहिलेले, त्यातील दोन ओळी आजही आठवतात.

**अंधाराला घाबरणे सोपे अन् दिवा लावणं अवघड असते**
**पण कोणीतरी अवघड काम करणं जरुरीचे असते**

याही पेक्षा एक पत्र दलाई लामाचे, आपल्या काळात, यावर लिहिलेले १५ मे जागतिक कुटुंब दिनानिमित्त ते पण तिबेटी भाषेत पण त्याचा अनुवाद शोभा भागवत यांनी केला आहे. त्याचा अनुवाद खाली देत आहे. कारण यातून आपणास बरेच काही घेण्यासारखे आहे, त्यासाठीच तर हा पत्र प्रपंच.

सप्रेम नमस्कार,

आपल्या काळात इमारतीची उंची वाढली पण माणुसकीची कमी झाली का? रस्ते रुंद झाले, पण दृष्टी अरुंद झाली का? खर्च वाढला आणि शिल्लक कमी झाली. घरे मोठी, पण कुटुंब छोटी झाली... सुख सोयी पुष्कळ, पण वेळच दुर्मिळ झाला. पदव्या स्वस्त, अन शहाणपण महाग झाले. माहितीचे डोंगर जमले, पण नेमकेपणाचे झरे आटले. तज्ञ वाढले अन समस्याही वाढल्या. औषध भरपूर पण आरोग्य कमी झालं. मालकीची भाषा वाढली अन मुल्यांची कमी झाली. हक्कांच्या बाबत आपण आग्रही झालोत, पण कर्तव्यांचे काय? आपल राहणीमान उंचावलं, पण जगणं दळभद्री झालं. आपण बोलतो फार... प्रेम क्वचितच करतो... आणि तिरस्कार मात्र सहज करतो... आपण भले चंद्रावर गेलो-आलो, पण शेजारच्या नव्या माणसाला, भेटणं काही होत नाही. बाहेरचा परिसर आपण जिंकत चाललो आहोत. पण आतल्या हरण्याचं काय? हवा शुध्द करण्यासाठी आटा-पिटा पण आत्माच्या गुदमरण्याचे काय? आपली आवक वाढली पण "नियत" कमी झाली. उपकारांसाठी आपण उतावळे फार, पण गरजूंच्या मदतीला मात्र कंटाळा. हृदयी फक्त महत्वाकांक्षा अन भोगवाद. करुणेला तर तेथे जागाच नाही. हा काळ उंच माणसांचा, पण खुज्या व्यक्तिमत्वांचा. उदंड-फायद्याचा, पण उथळ नात्यांचा. जागतिक शांततेच्या गप्पांचा, पण घरातल्या युध्दांचा. मोकळा वेळ हाताशी, पण त्यातली गंमतच गेलेली. दोन मिळवती माणसं पण घटस्फोट वाढलेले. दिखाव्याच्या खिडकीतून खूप काही मांडलेले, पण कोठीची खोली तर रिकामीच. आज तुम्हाला स्वातंत्र्य आहे, या पत्राकडे लक्ष देण्याचं... किंवा न देण्याचं... वाटलं तर, यात काही बदला... किंवा... विसरुन जा...

✤✤✤

## कोराडी वीज केंद्र अल्पबचत कार्याची प्रशंसा

राष्ट्रीय बचत संस्था (वित्त मंत्रालय, भारत सरकार)च्या वतीने नुकतेच कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात बचत दिनाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय बचत संस्थेचे संचालक श्री.अनिल भट्टाचार्य प्रमुख अतिथी म्हणून तर अध्यक्षस्थानी कोराडी वीज केंद्राचे मुख्य महाव्यवस्थापक श्री.ज्ञानेश्वर थुटूरकर होते. कोराडी वीज केंद्राच्या वतीने बचत गटाचे कार्य पगारातून होत असल्याबद्दल त्यांनी व्यवस्थापनाचे व पगारपत्रक गटाची प्रशंसा केली. श्री. थुटूरकर यांनी कोराडी वीज केंद्राच्या प्रत्येक कर्मचा-याने बचत गटात सहभागी होऊन योगदान देण्याचे आवाहन केले. कोराडी वीज केंद्राकडून दरमहा एक लक्ष रूपयांपेक्षा जास्त अल्पबचत गटाचे काम करणाऱ्या कर्मचा-यांना स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय बचत संस्थेचे श्री.एस.के.त्रिपाठी, श्री.पदमसिंह तर कोराडी वीज केंद्राचे आस्थापना अधिकारी श्री.आनंद कोंत, सौ.झरारिया प्रामुख्याने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.पी.डी.साखरवाडे यांनी केले तर श्री.यु.आर.देवरकर व श्री.आर.डी.निमजे तसेच अधिकारी व कर्मचा-यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## कोराडी प्रशिक्षण केन्द्रात ट्रेनिंग ॲडव्हाईजरी कमेटीची सभा संपन्न.

कोराडी प्रशिक्षण केद्रामध्ये दि. ०९.०७.२००९ ला महाजेनको च्या ट्रेनिंग ॲडव्हाईजरी कमेटी ची प्रथम बैठक आयोजित करण्यात आली. या कमेटीच्या अध्यक्षस्थानी श्री मधुकर शेलार संचालक (संचलन) तर सचिवपदी श्री अरविंद चौधरी कार्यकारी संचालक (मा.सं.) असून अन्य सदस्यांत नॅशनल पॉवर इन्स्टिटयूटचे श्री आर के शर्मा प्रिन्सीपॉल डायरेक्टर महाजेनकोचे माजी संचालक श्री विनय बापट व महावितरणचे माजी संचालक श्री अनिल पालमवार यांनी या सभेच्या निमित्ताने कोराडी प्रशिक्षण केद्राला भेट दिली.

महानिर्मितीचे प्रशिक्षणाबाबत या बैठकीमध्ये धोरणात्मक चर्चा करण्यात आली. धोरणात्मक निर्णयाच्या अंमलबजावणीची जबाबदारी मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) श्री लक्ष्मीकांत कडाव यांचेवर सोपविण्यात आली.